# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर

P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in


## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.०८/०९/२०१९

## दि.०७/०९/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५९६/१९,भादविक १४३,१४७,१४८,१४९,३२३,५०४,५०६(२),आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | राहुल राजगोळकर,वय-२२,रा.न-हे,पुणे |
| **आरोपी** | १.अनिकेत संजय बावस्कर,वय-१९,रा.परांजपे सोसा.न-हे,पुणे २.फैजल फिरोज काझी,वय-२०,रा.मानाजीनगर,न-हे,पुणे ,३.प्रसाद अर्जुन धावडे,वय-१९,रा.जाधवनगर,नांदेड फाटा,पुणे ४.अमोल संतोष येडवे,वय-१९,रा.मानाजीनगर,न-हे,पुणे ५.प्रशांत मारुती बावधने,वय-२०,रा.भिमनरगर,कोंढवे-धावडे,पुणे ६.अभिजीत बंडु कांबळे,वय-२०,रा.भुमकरनगर,न-हे,पुणे ७.सलीम हनिफ शेख,वय-१९,रा.मानाजीनगर,न-हे,पुणे (अटक) व इतर चार ते पाच साथीदार |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०९/१९ रोजी २२/१५ वा. कात्रज आईस्क्रिम पार्लर शॉप नं.१९,स्वामी प्लाझा,महाराजा चौक,न-हे,पुणे व हॉटेल बरकत बिर्याणी,तुलीप अपार्ट. तसेच जेएसपीएम कॉलेज चौकाती टपरी या ठिकाणी |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी काहीएक कारण नसताना,गैर-कायदयाची मंडळी जमवुन,हातात कोयते व लाकडी बांबु घेवुन येवुन,सदर हॉटेल व शॉप मध्ये तोडफोड करुन,त्याचे नुकसान करुन हॉटेल मधील ग्राहंकाना हाताने व लाकडी बांबुने मारहाण करुन पळवुन लावले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मांगडे ९४२२१५००५० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतु:श्रृंगी पो स्टे ७८८/१९,भादविक ४४८,४२७,१४१,१४३,१४७,१४९,३८०, ३४ |
| **फिर्यादी** | एक परूष,वय-४० वर्षे,रा.४१५,गणेश पेठ,पुणे |
| **आरोपी** | एक पुरूष व एक महिला तसेच इतर पाच ते सहा इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०८/२०१९ रोजी पहाटे ०३/३० वा.बाणेर येथील स.नं.६३/१/१ येथील फिर्यादी यांचे दुकानात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे नमुद घटनास्थळाचे दुकानाचे ताबे वहीवाटीचे जागेतुन,यातील नमुद एक पुरूष व एक महिला तसेच इतर इसमांनी फिर्यादी यांना गुंडगिरीच्या जोरावर दहशत माजवुन,हुसकावुन लावण्यासाठी,कटकारस्थान करुन,फिर्यादी यांचे दुकानात घुसुन,फिर्यादी यांचे दुकानातील साहीत्याची व वस्तुंची तोडफोड करुन,फिर्यादी यांचे दुकानाचे २५,०००/- रुपये किंमतीचे पत्रे,ॲगल,रॅक,वीजेचे मीटर व स्टॉल चोरुन नेले आहे. (फिर्यादी यांनी तक्रारी अर्ज दाखल केल्याने तक्रारी अर्जावरुन गुन्हा दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. विश्वास चव्हाणके ९९२१६७०००५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५९८/१९,भादविक ४९८(अ),३०६,३२३,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५२ वर्षे,रा.हिंगणे-खुर्द,सिंहगड,पुणे |
| **आरोपी** | १.सचिन लक्ष्मण धनकवडे,वय-३८,रा.आंबेगाव पठार,पुणे व तीन महिला (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१० ते दि.०४/०९/२०१९ रोजी २२/०० वा.चे दरम्यान स.नं.१७ धनकवडे पाटीलनगर आंबेगाव-पठार,पुणे याठिकाणी |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची मुलगी सौ.अलका दत्तात्रय धनकवडे,वय-३० वर्षे,रा.सदर हि तीचे सासरी नांदत असताना,तीस वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,यातील नमुद इसम तीचा दिर सचिन लक्ष्मण धनकवडे,सासु,जाव व नणंद यांनी संगनमत करून,तीस घरगुती कारणा वरून तीचा शारिरीक व मानसिक छळ करून,सौ.अलका हिस राहते घरी विषारी औषध पिवुन,तीस आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. व्हि.व्हि.डिगे |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ७८७/१९,भादविक ४२०,४०६,३४,मो.फा.कायदा कलम ८ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४८ वर्षे,रा.बाणेर रोड,पुणे |
| **आरोपी** | एकुण तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३/०९/२०१६ रोजी ते आजपावेतो स.नं.२९/६/१,ब व २९/६,बालेवाडी येथील या मिळकतीवर ग्रॅव्हीटी प्रोजेक्टचे साईटवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे पत्नीचे नावावर काहीतरी इन्व्हेस्टमेंट असावी याकरीता फिर्यादी हे त्यांचे पत्नी हिचेसह बालेवाडी परिसरात ऑफिस व शॉप यामध्ये इन्व्हेस्टमेंट करणेकरीता शोध घेत त्यांचे घराचे जवळील कमर्शिअल कामे चालु असलेल्या साईटना भेटी देत असताना,एप्रिल २०१६ मध्ये बालेवाडी येथील मिटकॉन कॉलेजच्या पाठीमागील स.नं.२९/६/१, ब व २९/६,बालेवाडी येथील या मिळकतीवर ग्रॅव्हीटी प्रोजेक्टचे साईटवर बांधकाम चालु असलेल्या साईटवर गेले असताना,फिर्यादी व साक्षीदार यांना यातील नमुद इसमांनी संगनमत करून,बालेवाडी येथील कमर्शिअल कॉम्प्लेक्सच्या ग्रॅव्हीटी प्रोजेक्ट मध्ये शॉप आणि ऑफिसेस मध्ये गुंतवणुकी बाबतचा करार करुन,फिर्यादी व साक्षीदार यांना शॉप व ऑफिस मध्ये गुंतवणुक करावयास लावुन,ग्रॅव्हीटी ह्या प्रोजेक्टचे कोणतेही बांधकाम पुर्ण न करता,करार पत्रानुसार शॉप व ऑफिसचा ताबा फिर्यादी व साक्षीदार यांना न देता,सदर इसमांना त्यांचे एस.डी.जी. रियालीटी कंपनीस दिलेले एकुण १,७१,४१,५२४/- रुपये त्यांनी स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी वापरुन,फिर्यादी यांची आर्थिक फसवणुक केली आहे. (तक्रारी अर्जावरुन सदर बाबतचा गुन्हा दाखल केला आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. विश्वास चव्हाणके ९९२१६७०००५ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**